# व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य
# औद्योगिक प्रशिक्षण संस्थेसाठी केंद्रीय ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया २०२२

## संस्थास्तरीय समुपदेशन फेरीत प्रवेशाकरिता उमेदवारांनी अवलंबविण्याची प्रमाणित कार्यपध्दती

### संस्थास्तरीय समुपदेशन फेरी पहिला टप्पा: दि.२९.०८.२०२२ ते दि.०५.०९.२०२२

१. **संस्थास्तरीय समुपदेशन फेरीसाठी उमेदवारांची पात्रता:**

१.१. ज्या उमेदवारांनी प्रवेश अर्ज परिपूर्ण भरून प्रवेश अर्ज शुल्क जमा केले आहे.

१.२. तथापि खालील उमेदवार समुपदेशन फेरी साठी अपात्र असतील:

१.२.१. ज्या उमेदवारांनी प्रवेश अर्ज परिपूर्ण भरून प्रवेश अर्ज शुल्क जमा केलेले नाही.

१.२.२. ज्या उमेदवारांनी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत प्रवेश निश्चित केलेले आहेत.

१.२.३. ज्या उमेदवारांनी खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत संस्थास्तरीय जागेवर (Institute Level Seats) प्रवेश निश्चित केलेले आहेत.

१.२.४. ज्या उमेदवारांनी खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये संस्थास्तरावर प्रवेशासाठी (Institute Level Seats) नोंदणी केलेली आहे, म्हणजेच ज्यांच्या नोंदणी क्रमांकात "A" अक्षरा ऐवजी "P" अक्षर असेल असे उमेदवार.

२. **संस्था स्तरीय प्रवेशासाठी उपलब्ध जागा: दि.२९.०८.२०२२**

२.१. सर्व शासकीय व खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील चौथ्या प्रवेश फेरीनंतर रिक्त राहिलेल्या जागा या संस्थास्तरीय समुपदेशन फेरीसाठी उपलब्ध राहतील.

२.२. दि.२९.०८.२०२२ रोजी सायंकाळी ०५.०० वाजेनंतर उमेदवारांना त्यांच्या प्रवेश खात्यात प्रवेश करून "Admission Activities > Vacant Seat Report" या टॅबव्दारे संस्थानिहाय रिक्त जागांचा तपशील पाहता येईल.




३. **राज्यस्तरीय सर्वसाधारण गुणवत्ता यादी** (State General Merit List)**: दि.२९.०८.२०२२**

३.१. दि.२९.०८.२०२२ रोजी सायंकाळी ०५.०० वाजेनंतर समुपदेशन फेरीसाठी पात्र सर्व उमेदवारांची राज्यस्तरीय सर्वसाधारण गुणवत्ता यादी प्रकाशित करण्यात येईल.

३.२. उमेदवारांना त्यांच्या प्रवेश खात्यात प्रवेश करून "Admission Activities > Application, Merit and Admission Status" या टॅब व्दारे त्यांचा राज्यस्तरीय सर्वसाधारण गुणवत्ता क्रमांक (State General Merit Number) पाहता येईल



४. **संस्थास्तरीय समुपदेशन फेरीसाठी नोंदणी करणे (Mark Attendance): दि.३०.०८.२०२२ ते दि.३१.०८.२०२२**

४.१. पात्र उमेदवारांनी त्यांच्या प्रवेश खात्यात प्रवेश करावा.

४.२. “Admission Activities > Mark Attendance for counselling” या टॅबव्दारे समुपदेशन फेरीसाठी नोंदणी करावी.




४.३. उमेदवाराने त्यांच्या पसंतीची औद्योगिक प्रशिक्षण संस्था निवडावी व “Mark Attendance” या टेप वर क्लिक करावे




४.४. उमेदवार त्यांच्या पसंतीच्या एकापेक्षा अधिक औद्योगिक प्रशिक्षण संस्थांची निवड करू शकतात.



| S.NO. | Name of ITI | District | Action |
|---|---|---|---|
| 1 | GOVERNMENT INDUSTRIAL TRAINING INSTITUTE, ANDHERI, TAL: ANDHERI, DIST: MUMBAI SUBURBAN | MUMBAI SUBURBAN | Delete |
| 2 | GOVERNMENT INDUSTRIAL TRAINING INSTITUTE, BORIVALI, TAL: BORIVALI, DIST: MUMBAI SUBURBAN | MUMBAI SUBURBAN | Delete |

GENERATE & SAVE(PDF)

४.५. उमेदवाराने निवड केलेल्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थांची यादी “Generate & Save (PDF)” या टॅबवर क्लिक करून नोंदणी निश्चित करावी व आवश्यक असल्यास निवड केलेल्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थांच्या यादीची छापील परत घ्यावी.

५. **औद्योगिक प्रशिक्षण संस्था निहाय गुणवत्ता क्रमांक तपासणे: दि.०१.०९.२०२२**

५.१. प्रत्येक औद्योगिक प्रशिक्षण संस्थेसाठी त्या संस्थेची निवड केलेल्या उमेदवारांच्या राज्यस्तरीय सर्वसाधारण गुणवत्ता क्रमांकानुसार (State General Merit Number) समुपदेशन फेरीसाठी औद्योगिक प्रशिक्षण संस्था निहाय गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल.

५.२. उमेदवाराने त्यांचा प्रवेश खात्यात प्रवेश करावा.

५.३. दि.०१.०९.२०२२ रोजी सायंकाळी ०५.०० वाजेनंतर उमेदवाराने निवड केलेल्या सर्व औद्योगिक प्रशिक्षण संस्थांसाठी त्यांचा गुणवत्ता क्रमांक पाहण्यासाठी “Admission Activities > Institute wise merit list counselling” या टॅबवर क्लिक करावे.




५.४. उमेदवाराने निवड केलेल्या सर्व औद्योगिक प्रशिक्षण संस्थांसाठी त्यांचा गुणवत्ता क्रमांक व समुपदेशन फेरीसाठी संबंधित संस्थेत उपस्थित राहण्यासाठी दिनांक व वेळ देण्यात येईल (Day and Slot Time)

CANDIDATE INSTITUTE WISE MERIT LIST - COUNSELLING ROUND

STATE LEVEL GENERAL MERIT NUMBER : 1

| Institute Name | Institute Level Merit No. | Day | Slot time |
|---|---|---|---|
| GOVERNMENT INDUSTRIAL TRAINING INSTITUTE, BORIVALI, TAL: BORIVALI, DIST: MUMBAI SUBURBAN | 1 | 2 Sep | 8am |
| GOVERNMENT INDUSTRIAL TRAINING INSTITUTE, ANDHERI, TAL: ANDHERI, DIST: MUMBAI SUBURBAN | 2 | 2 Sep | 8am |

६. **समुपदेशन फेरी: दि.०२.०९.२०२२ ते दि.०५.०९.२०२२**

६.१. उमेदवारास दिलेल्या वेळ व दिनांकास त्यांनी संबंधीत औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत किमान १ तास अगोदर सर्व आवश्यक दस्तऐवज/ प्रमाणपत्र व प्रशिक्षण शुल्कासह उपस्थित रहावे.

६.२. संबंधीत औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत समुपदेशन फेरीसाठी हजर असलेल्या उमेदवारांना त्यांच्या गुणवत्ता क्रमांकानुसार समुपदेशनाकरिता बोलाविण्यात येईल. प्रवेशाकरिता उपलब्ध जागा, उमेदवाराची मागणी व उमेदवाराची अर्हता या आधारावर प्रवेशाच्या जागांचे वाटप करणे.

६.३. समुपदेशन फेरीमध्ये उपलब्ध सर्व जागा हया सर्वसाधारण जागा म्हणून समजल्या जातील.

६.४. समुपदेशन फेरीसाठी वेळ व दिनांक उपलब्ध करून दिला असलातरी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील जागांचे वाटप हे पूर्णत: उपलब्ध रिक्त जागा व उमेदवाराची पात्रता यावर अवलंबून असेल

६.५. सदर प्रवेशफेरीत जागा बहाल करण्यात आलेल्या उमेदवारांनी त्याच दिवशी सर्व मूळ प्रमाणपत्रांच्या पडताळणीनंतर प्रवेश निश्चितीची प्रत्यक्ष कार्यवाही करावी.

६.६. उमेदवार दिलेल्या वेळ व दिनांकास संबंधीत संस्थेत उपस्थित न राहिल्यास अन्य वेळ व दिनांक उपलब्ध करुन देण्यात येणार नाही.

६.७. उमेदवारास दिलेल्या वेळ व दिनांकास त्यांनी व्यक्तिश: उपस्थित राहणे अनिवार्य आहे. उमेदवाराच्या अपरोक्ष त्याचे नातेवाईक/ पालक/ मित्र व अन्य कोणीही व्यक्ती समुपदेशन फेरीसाठी उमेदवाराच्या वतीने उपस्थित राहण्यास परवानगी नाही.

६.८. उमेदवारांनी त्याच दिवशी प्रवेश निश्चित न केल्यास त्यांना बहाल करण्यात आलेली जागा दुसऱ्या दिवशी रिक्त समजून प्रवेशासाठी खुली करण्यात येईल.

संस्थास्तरीय समुपदेशन फेरी दुसरा टप्पा: दि.०६.०९.२०२२ ते दि.१०.०९.२०२२

७. संस्था स्तरीय प्रवेशासाठी उपलब्ध जागा:

७.१. सर्व शासकीय व खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील संस्थास्तरीय समुपदेशन फेरी पहिला टप्प्यानंतर रिक्त राहिलेल्या जागा पुढील संस्थास्तरीय समुपदेशन फेरीसाठी उपलब्ध राहतील.

७.२. उमेदवारांना त्यांच्या प्रवेश खात्यात प्रवेश करून “Admission Activities > Vacant Seat Report” या टॅबव्दारे संस्थानिहाय रिक्त जागांचा अद्यावत (Real time) तपशील पाहता येईल.

८. संस्थास्तरीय समुपदेशन फेरीसाठी नोंदणी करणे (Mark Attendance):

८.१. पात्र उमेदवारांना संस्थांची निवड करुन आगावू (Advance) नोंदणी करण्याची आवश्यकता नाही.

९. समुपदेशन फेरी: दि.०६.०९.२०२२ ते दि.१०.०९.२०२२

९.१. प्रवेशोच्छुक व नोंदणीकृत उमेदवारांनी ते प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या शासकीय वा खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत व्यक्तीश: हजर राहून समुपदेशन फेरीकरिता सकाळी ८.०० वाजेपासून दुपारी १२.०० वाजेपर्यंत हजेरी नोंदवावी.

९.२. दुपारी १२.०० वाजेपर्यंत हजेरी नोंदविलेल्या उमेदवारांमधून पहिली गुणवत्ता यादी दुपारी १.०० वाजता संस्थास्तरावर तयार करण्यात येईल व उमेदवारांना सदर यादील त्यांच्या गुणवत्ता क्रमांकानुसार समुपदेशनाकरिता त्याच दिवशी बोलविण्यात येईल.

९.३. संबंधीत औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत समुपदेशन फेरीसाठी हजर असलेल्या उमेदवारांना त्यांच्या गुणवत्ता क्रमांकानुसार समुपदेशनाकरिता बोलाविण्यात येईल. प्रवेशाकरिता उपलब्ध जागा, उमेदवाराची मागणी व उमेदवाराची अर्हता या आधारावर प्रवेशाच्या जागांचे वाटप करणे.

९.४. समुपदेशन फेरीमध्ये उपलब्ध सर्व जागा हया सर्वसाधारण जागा म्हणून समजल्या जातील.

९.५. समुपदेशन फेरीसाठी हजेरी नोंदवीली असलीतरी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील जागांचे वाटप हे पूर्णत: उपलब्ध रिक्त जागा व उमेदवाराची पात्रता यावर अवलंबून असेल

९.६. सदर प्रवेशफेरीत जागा बहाल करण्यात आलेल्या उमेदवारांनी त्याच दिवशी सर्व मूळ प्रमाणपत्रांच्या पडताळणीनंतर प्रवेश निश्चितीची प्रत्यक्ष कार्यवाही करावी.

९.७. उमेदवाराने समुपदेशन फेरीसाठी व्यक्तिश: उपस्थित राहणे अनिवार्य आहे. उमेदवाराच्या अपरोक्ष त्याचे नातेवाईक/ पालक/ मित्र व अन्य कोणीही व्यक्ती समुपदेशन फेरीसाठी उमेदवाराच्या वतीने उपस्थित राहण्यास परवानगी नाही.

९.८. उमेदवारांनी त्याच दिवशी प्रवेश निश्चित न केल्यास सदर जागा दुसऱ्या दिवशी रिक्त समजून प्रवेशासाठी खुली करण्यात येईल.